महाराष्ट्र शासन

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग

# व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

http://admission.dvet.gov.in ; www.dvet.gov.in ; itiadmissions@dvet.gov.in

## शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील ऑगस्ट २०२१ सत्रासाठी प्रवेश सूचना

राज्यातील शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेतंर्गत (Craftsman Training Scheme) ऑगस्ट २०२१ सत्रातील प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रीया (Centralized Online Admission Process) पध्दतीने करण्यांत येत असून प्रवेशाची सविस्तर "माहितीपुस्तिका - प्रवेश पध्दती, नियमावली व प्रमाणित कार्यपध्दती" प्रवेश संकेत स्थळावर Download Section मध्ये Pdf स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

प्रशिक्षण महासंचालनालय, नवी दिल्ली यांनी प्रवेशाची अंतिम तारीख दि.३०.१०.२०२१ पर्यंत वाढविली असल्याने पुरवणी प्रवेश वेळापत्रक खालील प्रमाणे असेल. सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील केंद्रीयप्रवेश प्रक्रियेव्दारे भरण्यासाठी उपलब्ध जागांपैकी रिक्त जागा संस्थास्तरीय समुपदेशन फेरीव्दारे भरण्यासाठी उपलब्ध राहतील. संस्थास्तरीय समुपदेशन प्रवेश फेरीकरिता उपलब्ध जागांचा तपशील प्रवेश संकेतस्थळावर "Vacant Seats" मध्ये उपलब्ध आहेत.

**प्रवेशाचे वेळापत्रक**

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रीयेचा तपशील | प्रारंभ दिनांक | अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| १.० | संस्थास्तरीय समुपदेशन फेरी | | |
| १.१ | प्रवेशोच्छुक व नोंदणीकृत उमेदवारांनी संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सकाळी ०८.०० वाजेपासून ते ११.०० वाजेपर्यंत व्यक्तीश: हजर राहुन समुपदेशन फेरीकरीता **दररोज स्वतंत्ररित्या** हजेरी नोंदवावी. | १९ ऑक्टोबर, २०२१ | ३० ऑक्टोबर, २०२१ |
| १.२ | संस्थेत त्या दिनांकास सकाळी ११.०० वाजेपर्यंत उपस्थित असलेल्या सर्व नोंदणीकृत उमेदारांची हजेरी संबंधीत संस्थेव्दारे दुपारी ०१.०० वाजेपर्यंत संकेतस्थळावर नोंदविणे. | | |
| १.३ | संस्थास्तरीय समुपदेशन फेरीसाठी हजेरी नोंदविलेल्या उमेदवारांमधून त्याच दिवशी संबंधित संस्थास्तरावर दुपारी ०१.०० वाजता गुणवत्ता यादी तयार करुन प्रकाशित करणे. | | |
| १.४ | संस्थास्तरावर तयार केलेल्या गुणवत्ता यादी नुसार उमेदवारांना समुपदेशनाकरिता बोलाविण्यात येईल. प्रवेशाकरिता उपलब्ध जागा, उमेदवाराची मागणी, उमेदवाराची अर्हता या आधारावर प्रवेशाच्या जागांचे वाटप करण्यात येईल. | | |
| १.५ | सदर प्रवेशफेरीसाठी निवड झालेल्या उमेदवारांनी सर्व मूळ प्रमाणपत्रांच्या पडताळणीनंतर संबंधित औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत त्याच दिवशी प्रवेश निश्चितीची प्रत्यक्ष कार्यवाही करावी. उमेदवारांनी त्याच दिवशी प्रवेश निश्चित न केल्यास सदर जागा दुसऱ्या दिवशी रिक्त समजुन प्रवेशासाठी खुली करण्यात येईल. | | |
| २.० | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील संस्था स्तरावरील प्रवेश | | |
| २.१ | खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधील संस्थास्तरावरील जागांवर (माहिती पुस्तिकेतील मुद्दा क्र. १.४ प्रमाणे) संबंधित खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्थाव्दारे प्रवेश निश्चित करणे. | ०७ सप्टेंबर, २०२१ स.९.०० वाजेपासून | ३० ऑक्टोबर, २०२१ रा.११.५९ वाजेपर्यंत |

**महत्वाची सुचना :**

१. राज्यातील सर्व शासकीय व खाजगी औ.प्र. संस्थांतील सर्व प्रकारच्या जागांसाठी प्रवेश हे केंद्रीय ऑनलाईन पध्दतीने होत असून केंद्रीय पध्दतीत उपलब्ध जागा व संस्थास्तरावरील जागांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक राहील. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन प्रवेश प्रणाली व्यतिरिक्त प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे प्रवेश ग्राह्य धरण्यात येणार नाही याची सर्व उमेदवार, पालक व औ.प्र. संस्थांनी नोंद घ्यावी.

२. प्रवेश पध्दती, नियमावली, प्रवेश संकेतस्थळाबाबत तांत्रिक व तद्नुषंगिक शंका असल्यास नजिकच्या शासकीय वा खाजगी औ.प्र. संस्थेस संपर्क साधावा अथवा संबंधीत प्रादेशिक कार्यालयाच्या मदत कक्षास प्रवेश संकेतस्थळावर देण्यात आलेल्या दुरध्वनी क्रमांकावर सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत संपर्क साधावा. सदर मदत कक्षास संपर्क साधण्यापूर्वी माहितीपुस्तिका अभ्यासावी.

-Sd-

(दि. अं. दळवी)

संचालक

स्थळ: मुंबई

दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२१